## ग्रीनलॉन्स विदयालय

**इयत्ता – ९ वी-अ,ब,क TERMINAL EXAMINATION मार्क – ८0**

**दिनांक -०९-१० -२०२४ विषय – मराठी वेळ-2 ½तास**

**INSTRUCTIONS- 1. This paper comprises of two sections. Section A and section B.**

**2. Section A & Section B Answers must be written on the answer sheet.**

---

## विभाग- "अ"

### प्रश्न १. खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :

मुंबई प्रांतात रेल्वे असावी असा उठाव मुंबईला प्रथम सर जमशेटजी जीजीभाई आणि जगन्नाथ नाना शंकरशेठ यांनी केला. मुळजी जेठा मोरारजी गोकुळदास, आदमजी पीरभाई , डेविड ससून वगैरे अनेक नामांकित नगरशेटजीचे अर्थात त्यांना पाठबळ होतेच. सन १८५३ मध्ये ग्रेट इंडियन पेनिनशूला रेल्वेचा पहिला छोटा फाटा मुंबई ते ठाणेपर्यंत एकेरी रस्त्याचा तयार झाला. लोखंडी रुळांवरून इंग्रज आगीनगाडी चालवणार, ही कल्पनाच मोठी अचंब्याची वाटली.

मुहूर्तावर निघालेली पहिली आगगाडी ठाण्याला जाऊन मुंबईला सुखरूप परत आली. पण त्या वाफेच्या गाडीत बसायचा लोकांना धीरच होईना. दुसऱ्या दिवसापासून लोकांना मोफत ठाणे ते मुंबई आणि परत नेण्या- आणण्याची दवंडी पिटण्यात आली. आगगाडीत बसणे धोक्याचे नाही, प्रवास लवकर नि सुखाचा होतो, हे लोकांना पटवण्याची रेल्वेच्या कारभाऱ्यानी खूप आटापिटा केला. पण लोकांत भलत्याच कड्या नि अफवांचे पीक पिकले होते . वाफेची गाडी ही विग्रेजांची विलायती भुताटकी आहे, मुंबईला नव्या इमारती नि पूल बांधताहेत , त्यांच्या पायांत जिवंत गाढायला फूस लाऊन माणसे नेण्याचा हा साळसूद डाव आहे.

अखेर दर माणशी एक रुपया इनाम आणि मोफत प्रवासाचा डंका वाजवला. पैशाच्या लालुचीने ठाण्याच्या घंटाळीवरचे आणि मुंबईचे लोक आगगाडीने जाऊ लागले का त्यांच्या घरची माणसे आजूबाजूला उभी राहून ठणाण धाय मोकलायची. त्यांची समजूत काढता काढता रेल्वेचे अधिकारी अगदी टेकीला यायचे. रुपयाचे इनाम पुढे आठ आण्यांवर आले. नंतर चार आणे झाले. लोकांचा धीर चेपलासे पाहून, इनामे बंद झाली नि सर्रास तिकिटे सुरु झाली. एरवीचा ठाणे - मुंबईचा बैलांच्या खटारगाडीचा प्रवास म्हणजे तब्बल एक दिवस जायचा, पण आता काय, अवघ्या सव्वा तासात ठाण्याचा असामी मुंबईला येऊ जाऊ लागला .

बोरघाटाचे काम चालले असतानाच मुंबई - पुण्याचा रेल्वे प्रवास ज्यारीने चालू झाला. कसा ती मौज ऐका आता. पुण्याची गाडी खंडाळ्याला आली का सगळ्या पासिंजरांना तेथून पालख्या , डोल्या , खुर्च्या नि बैलगाड्यांत बसवून घाटाखाली खोपावलीला आणायचे. सगळा काफिल्ला खोपावलीला आला का तेथे पुन्हा आगगाडीत बसवून झुकझुक करीत खुशाल मुंबईला रवाना व्हायचे . प्रवाशांची ही घाट उतरणीची सुखसोय नि सरबराई पाहण्याचे कंत्राट मुंबईच्या करशेटजी जमशेटजी नावाच्या व्यापाऱ्याने घेतले होते.

**कृती १. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा: गुण ४**

१. अखेर दर माणशी कोणता प्रवासाचा डंका वाजवला?

२. मुंबई प्रांतात रेल्वे असावी असा उठाव मुंबईला प्रथम कोणी केला?

३. लोकांना कोणती कल्पनाच मोठी अचंब्याची वाटली?

४. प्रवाशांची ही घाट उतरणीची सुखसोय नि सरबराई पाहण्याचे कंत्राट कोणत्या व्यापाऱ्याने घेतले होते?

**कृती २ : रिकाम्या जागी योग्य शब्द लिहून वाक्ये पुन्हा लिहा : गुण २.**

१. मुहूर्तावर निघालेली पहिली ---------------------- ठाण्याला जाऊन मुंबईला सुखरूप परत आली.

२. अवघ्या ------------------------- तासात ठाण्याचा असामी मुंबईला येऊ जाऊ लागला .

३. त्यांची समजूत काढता काढता ------------------ अधिकारी अगदी टेकीला यायचे.

४. पण त्या ------------------------------ गाडीत बसायचा लोकांना धीरच होईना.

**कृती ३ : खालील प्रश्नाची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा : गुण ४**

१. बोरघाटाचे काम चालले असतानाच मुंबई - पुण्याचा रेल्वे प्रवासाची मौज कशी होती ते लिहा?

२. लोकांच्या मनात कोणत्या भलत्याच कड्या आणि अफवांचे पीक पिकले होते?

**प्रश्न २. खालील कवितेच्या आधारे विचारलेल्या प्रश्नाची उत्तरे लिहा :**

भेटीलागी जीवा लागलीसे आस |

पाहे रात्रंदिवस वाट तुझी ||१||

पूर्णिमेचा चंद्रमा चकोराजीवन |
तैसे माझे मन वाट पाहे ||२||
दिवाळीच्या मुळा लेकी आसावली |
पाहतसे वाटुली पंढरीची ||३||
भूकेलिवा बाळ अति शोक करी |
वाट पाहे उरि माउलीची ||४||
तुका म्हणे मज लागलीसे भूक |
धांवूनि श्रीमुख दांवी देवा ||५||

**कृती १ : प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा : गुण ३**

१. चकोर म्हणजे काय ?

२. शोक म्हणजे काय ?

३. ‘भेटीलागी जीवा’ या कवितेचे संतकवी कोण आहेत?

**कृती २. खालील प्रश्नांचे उत्तर दोन ते तीन वाक्यात लिहा : गुण ३**

१. संतकवींनी पांडुरंगाच्या भेटीबाबत दिलेल्या दुष्टान्तातील तुम्हाला आवडलेला दुष्टान्त स्पष्ट करा?

**कृती ३. तक्ता पूर्ण करा : गुण ४**

| **अ.क्र.** | **वाट बघणारा** | **कोणाची वाट बघतो** | **वाट बघण्याचे कारण** |
|---|---|---|---|
| १. | चकोर | | चंद्रकिरण हेच त्याचे जीवन |
| २. | | माहेरचे बोलावणे येणे | दिवाळीला माहेरास जायला मिळणे |
| ३. | भुकेलेले बाळ | | खायला मिळेल म्हणून |
| ४. | | पांडुरंगाची | श्रीमुख पाहायला मिळावे |

**प्रश्न ३. खालील प्रश्नाची उत्तरे एका वाक्यात लिहा : ( कोणतेही ४) गुण ४.**

१. तीमिरातुनी तेजाकडे याचा अर्थ  काय आहे?

२. ऑलिंपिक सामने  दर किती वर्षांनी होतात?

३. सर्व चराचरात वास (राहणारा) कोण आहे?

४. अमेरिकेतील जेसी ओवेन्स याने बर्लिनला झालेल्या ऑलिंपिक स्पर्धेत किती अजिंक्यपदे मिळविली ?

५. परमेश्वर हा कसा आहे?

**प्रश्न ४. . खालीलपैकी अचूक पर्याय निवडून वाक्ये पूर्ण करा:    गुण ४**

१. खूपच उंच अशा एका स्तंभावर एक भलामोठा ---------------- फडफडत असलेला लेखकाला दिसला . ( १. पताका . २. ध्वज . ३. पतंग . ४. तिरंगा .)

२. ध्वजावर असलेली पाच वर्तुळे म्हणजे ------------- .( १. देश  २. प्रांत  ३. खंड ४. राष्ट्र)

३. ध्वजस्तंभाजवळ एक स्फूर्तिदायक -------------------  सतत तेवत असते .

( १. पणती . २. मेणबत्ती  ३. दिवा  ४. मशाल. )

४. ऑलिंपिक सामने ---------------  दिवस चालतात .

( १. दहा .  २. पाच .  ३. तीन .  ४. दोन. )

**प्रश्न ५. (अ) खालील शब्दांचे अर्थ लिहा:    (कोणतेही ८ )            गुण ४**

१. सदधर्म   २. उठाव  ३. अभिवादन  ३. सर्वात्मका ४. साळसूद

५. सुमन ६. माळका ७. गगन ८. कर्णा .९. नामांकित १०. सरबराई

**प्रश्न ५.(ब) वाक्प्रचार व अर्थ लिहा :                              गुण ४**

१. पाठबळ असणे   २. आटापीटा करणे  ३. सेवा करणे  ४ दवंडी पीटणे.

**प्रश्न ५.(क) खालील दिलेल्या शब्दावरून वाक्ये तयार करा.  (MAKE MEAININGFULL SENTENCES )  (कोणतेही ४ )                              गुण ४**

१. अंधार   २. माणूस  ३. ध्वज  ४.रंग  ५. गाव  ६. क्रीडा .

## विभाग ‘ ब ’

**प्रश्न १(अ). खालील अधोरेखित शब्दांचे समानार्थी शब्द बदलून वाक्य पुन्हा लिहा: गुण ३**

१. सचिनला क्रीडा स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे <u>इनाम</u> मिळाले.

२. शाळेमध्ये <u>विविध</u> विषय शिकविले जातात .

३. आज आकाश <u>निरभ्र</u> आहे.

प्रश्न १(ब). **खालील अधोरेखित शब्दांचे विरुद्धार्थी शब्द बदलून वाक्य पुन्हा लिहा: गुण ३**

१. मला केलेल्या कामाचे <u>समाधान</u> मिळाले.

२. विनयचा <u>छोटा</u> भाऊ खूप हुशार आहे.

३. माझे पुस्तक खूप <u>जुने</u> आहे.

**प्रश्न १(क). खालील अधोरेखित शब्दांचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा: गुण ३**

१. जंगलात एक <u>जनावर</u> आहे.

२. मुंबई शहरात अनेक <u>उपहारगृहे</u> आहेत.

३. शाळेच्या कामात मला <u>संधी</u> मिळाली.

**प्रश्न २.(अ) वाक्यांचे प्रकार ओळखा: गुण ३**

१. “ चला अभ्यासाला बसा ”

२. बाप रे ! केवढा मोठा साप आहे तिथे !

३. आज बुधवार आहे.

**प्रश्न २(ब). खालील वाक्यांतील काळाचे प्रकार ओळखा. गुण २**

१. ताई उद्या दिल्लीवरून येईल.

२. जनक मंदिरात जातो.

**प्रश्न २(क) खालील वाक्यात अधोरेखित शब्दांऐवजी कंसात आलेले योग्य वाक्प्रचार निवडून व वाक्ये पुन्हा लिहा: गुण २**

( खराब होणे , चांगला ग्रह होणे , प्रशंसा करणे , अचंबा वाटणे )

१. ओवेन्सचा वर्ण, त्याचा देश हे सर्व विसरून साऱ्या जगाने त्याचे <u>कौतुक</u> केले.

२. आपल्या शाळेचे नाव <u>वाईट होऊ नये</u>, म्हणून प्रत्येक विध्यार्थ्याने काळजी घ्यायला हवी.

**प्रश्न ३. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा : गुण ६**

१. आपल्या शाळेच्या ( FOR SCHOOL) क्रीडा विभागासाठी ( SPORTS DEPARTMENT) खेळ साहित्यांची (SPORTS EQUIPMENTS) मागणी ( ORDER )करणारे पत्र मा. व्यास्थापक ,अंकुरम स्पोर्ट्स केंद्र , काळबादेवी , मुंबई- ४००००२ यांना लिहा.

किंवा

२. आपल्या मित्रास ( FRIEND) चित्रकला ( DRAWING ) या स्पर्धेत (COMPETITION) प्रथम बक्षीस (FIRST PRIZE) मिळाल्याबद्दल अभिनंदन ( CONGRATULATION) करणारे पत्र लिहा:

**प्रश्न ४. खालील दिलेला उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :**

**यशस्वी जीवन**

रवी अगदी तुमच्याच वयाचा . त्याने त्याच्या वडिलांना विचारले , “ बाबा , ‘यशस्वी जीवन’ म्हणजे काय असते ?” वडिलांनी रवीकडे हसत बघितले आणि त्याला विचारले, “ तुला पतंग उडवायला आवडते का ?” तर तो म्हणाला, “ मला उंचावर उडणारा पतंग बघायला खूप आवडते.” वडिल म्हणाले, “ चल, मग आपण पतंग उडवूया.” ते दोघे त्यांच्या घराच्या गच्चीवर पतंग उडविण्यात गुंग होऊन गेले. त्यांना त्यात खूप मजा आली.

रवी वडिलांना म्हणाला, “ दोऱ्यामुळे पतंग अजून उंच जाऊ शकत नाही. आपण हा दोरा तोडून टाकूया का ?” म्हणजे पतंग अजून उंच जाईल . वडिलांनी रवीचे ऐकले व पतंगाचा धागा तोडून टाकला . पतंग थोडा वर गेला आणि त्यानंतर पतंग हळूहळू खाली आला आणि लांब अशा अनोळखी जागेवर जाऊन पडला.

रवी उदास झाला आणि तो वडिलांना म्हणाला, “ हा पतंग खाली का पडला ?” त्यावेळी वडिलांनी रवीला यशस्वी जीवनाचे महत्व समजावून सांगितले.

“ बेटा, त्या पतंगाचे अस्तित्व त्याच्या त्या दोरीमुळे होते. जोपर्यंत पतंग दोऱ्याने बांधलेला होता तोपर्यंत तो हवेत झोके घेत होता. त्याची दोरी त्या पतंगाला अधिक उंचावर नेण्यासाठी विरोध करत नव्हती तर त्याला आधार देत होती. बाळा जीवनात आपण ज्या उंचीवर आहोत तेव्हा आपल्याला नेहमी वाटते की, घर, कुटुंब, शिस्त, आई - वडील, गुरु, समाज या सर्वांपासून आपण स्वतंत्र होऊ इच्छितो . परंतु जीवनात जर आपल्याला उंची गाठायची असेल, तर हेच लोक आपल्याला त्यांच्या प्रेमाने आधार देतात व आपल्याला कधीही खाली पडू देत नाही. जसा पतंग धाग्याशिवाय उंच उडू

शकत नाही. तसे आपण आपल्या आई - वडील, गुरु व समाजाशिवाय यशाचे शिखर गाठू शकत नाही. यालाच "यशस्वी जीवन" म्हणतात .

**कृती १ एका वाक्यात उत्तरे लिहा : गुण ४.**

१. रवीने त्याच्या बाबांना कोणता प्रश्न विचारला ?

२. रवीला काय आवडते ?

३. रवीचे वडील पतंग उडवायला कोठे गेले ?

४. आपण कोणाशिवाय यशाचे शिखर गाठू शकत नाही ?

**कृती २ . रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा : गुण २**

१. वडिल म्हणाले, " चल, मग आपण ------------------------------ उडवूया."

२. आपण हा ------------------------------ तोडून टाकूया का ?

३. वडिलांनी रवीला ------------------------ जीवनाचे महत्व समजावून सांगितले.

४. जसा पतंग ----------------------------- उंच उडू शकत नाही .

**कृती ३ . खालील विधाने कोणी कोणास म्हटले ते लिहा : गुण २**

१. " तुला पतंग उडवायला आवडते का ?"

२. " हा पतंग खाली का पडला ?"

**कृती ४. खालील वाक्प्रचारांचा अर्थ लिहा : गुण २**

( मग्न होणे , पाठबळ देणे , प्राविण्य मिळणे , निराश होणे )

१. उदास होणे

२. गुंग होणे.

**कृती ५. खालील प्रश्नाचे उत्तर तीन ते चार वाक्यात लिहा : गुण २**

१. वडिलांनी रवीला यशस्वी जीवनाचे कोणते महत्व समजावून सांगितले?

**प्रश्न ५. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा : गुण ६**

१. माझे गाव

मुद्दे: (   गावाचे नाव -   गाव कोठे आहे - गावाचे स्वरूप - गावातील लोक - गावातील मुख्य व्यासाय - मदत करण्याची वृत्ती - गावाची जमीन - गावातील शेती - नदी - झाडे डोंगर

गावाचे वैशिष्टे .)

२. आमची सहल :

मुद्दे: ( शाळेचे नाव - शाळा कोठे आहे - शाळेची सहल कोठे गेली होती - सहलीला कशाने गेले - किती वाजता निघाले - कोणकोणते ठिकाणे बघितले - काय काय मजा केली - परतीचा प्रवास )

३. मला देव भेटला तर ------------

मुद्दे: ( ही कल्पना का सुचली ?- परमेश्वराचे आगमन - खरा धर्म - समाजसुधारण्यासाठी प्रयत्न -  देवाकडे काय काय मागणार - मनाची प्रसन्नता हाच खरा परमेश्वराचा साक्षात्कार )